**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारावयाच्या लोकवर्गणीबाबत...**

## महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो १११२/ प्र. क्र.९६ /पापु-०७,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. ३ ऑक्टोबर, २०१२

**वाचा** :-१. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/पापु ०७ .दि२७/७/२०००

२.शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु ०७ .दि१७/३/२०१०

३. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो १२०८/प्र.क्र.९६/पापु ०७,दि.१८/८/२००८

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.२ येथिल दि.१७ मार्च,२०१० च्या शासन निर्णयान्वये राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अमंलबजावणी सुरु झालेली आहे. राज्य शासनाच्या संदर्भ क्र. १ येथिल दि.२७ जुलै, २००० च्या धोरणात्मक शासन निर्णयास अनुसरुन लाभार्थ्यांकडून १०% लोकवर्गणी घेण्याबाबत स्पष्ट निर्देश दि.१७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत. प्रस्तुत लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून अथवा लाभार्थ्यांकडून वसूल करुन भरण्याची मुभा देण्यात आली आहे. लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून भरली तरी योजना कार्यान्वित झाल्यावर संबंधित लोकवर्गणी पाणीपट्टीसोबत वसूल करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येणारी लोकवर्गणी प्रचलीत धोरणानुसार योजनेच्या एकूण भांडवली खर्चावर १० टक्के प्रमाणे आकारली जाते.त्यापैकी ५ टक्के लोकवर्गणी रोख स्वरुपात व ५ टक्के लोकवर्गणी वस्तू अथवा श्रमदानाच्या स्वरुपात भरण्याची सवलत देण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जनजाती बहूल क्षेत्रासाठी ५ टक्के लोकवर्गणी आकारण्यात येते. त्यापैकी १ टक्के लोकवर्गणी रोख स्वरुपात व ४ टक्के लोकवर्गणी वस्तू अथवा श्रमदानाच्या स्वरुपात भरण्याची सवलत देण्यात आली आहे. याशिवाय ग्रामस्थांवरील लोकवर्गणीचा भार सुसह्य करण्यासाठी संदर्भ क्र. दि.१८ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयान्वये ज्या योजनांच्या उद्भवाचे अंतर मुख्य साठवण टाकीपासून ३ कि.मी. पेक्षा जास्त होत असेल अथवा १०० मी. पेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार असेल अशा योजनांमधील ३ कि.मी. पेक्षा पुढील अंतरावरील पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपींग मशिनरी इ. कामांसाठी येणाऱ्या खर्चावर लोकवर्गणी माफ करण्यात येते.

अनेक योजनांच्या बाबतीत उद्भव विहीर, जॅकवेल, पंपगृह,जलशुद्धीकरण केंद्र त्याचप्रमाणे जमिनीवरील व उंचावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यांच्या बांधकामासाठी ग्रामस्थांकडून जमिनी घेण्यात येतात. त्याशिवाय, ग्रामस्थांना योजनेच्या या उपांगांवर लोकवर्गणी भरावी लागते. त्यामुळे ग्रामस्थांकडून योजनेच्या ज्या उपांगासाठी जमिनी उपलब्ध होतील, त्या उपांगासाठीच्या खर्चावर लोकवर्गणीत सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारावयाच्या लोकवर्गणीसंदर्भात खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :

१. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची उद्भव विहीर, जॅकवेल, पंपगृह, जलशुद्धीकरण केंद्र त्याचप्रमाणे जमिनीवरील व उंचावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यांच्या बांधकामासाठी ग्रामस्थांकडून जर जमिनी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आलेल्या असतील आणि तसे जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले असेल तर, त्या जमिनीवर वरिल ज्या उपांगाचे बांधकाम करण्यात येईल त्या उपांगासाठीच्या खर्चावर लोकवर्गणी आकारण्यात येणार नाही.

उदा. योजनेच्या उद्भव विहीरीसाठी ग्रामस्थांकडून विनामूल्य जमिन उपलब्ध करून देण्यात आली असेल अथवा जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले असेल व या उद्भव विहीरीच्या बांधकामाची अंदापत्रकीय किंमत रू. २० लक्ष असेल तर उद्भव विहिरीच्या रु.२०.०० लक्ष खर्चावर अनुज्ञेय लोकवर्गणी माफ करण्यात यावी. अशा प्रकारे योजनेच्या उपरोक्त उपांगांसाठी जर ग्रामस्थांकडून विनामूल्य जमिन उपलब्ध करून देण्यात आली असेल आणि तसे जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले असेल तर या उपांगांच्या अंदाजपत्रकीय किंमतीवर लोकवर्गणी लागू होणार नाही.

२. मात्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची उद्भव विहीर, जॅकवेल, पंपगृह, जलशुद्धीकरण केंद्र त्याचप्रमाणे जमिनीवरील व उंचावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यांच्या बांधकामासाठी ग्रामपंचायतीने जमिन उपलब्ध करुन दिलेली असेल अथवा अशी जमिन शासकीय असेल तर वरिलप्रमाणे लोकवर्गणीत सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

३. लोकवर्गणीत वरिलप्रमाणे देण्यात येणारी सवलत सन २०१२-१३ व त्यानंतरच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मंजूर वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१००३११३९५२१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ल.गो.ढोके)

अवर सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री(पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य
महासंचालक,माहिती आणि जनसंपर्क संचालनालय,मुंबई
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवा प्राधिकरण,मुंबई
संचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
मुख्य अभियंता,ग्रामीण व नागरी म.जी.प्रा.
,मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवा प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता,ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व आज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व आज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिकि निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधि लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवा प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञाािक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड,नस्ती पापु-०७